- प्रेस नोट -

दि. १९/१०/२०२६

पार्कसाईट पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.१७/१०/२०२६ रोजी २३:३० वा. च्या सुमारास महिला फिर्यादी, वय-३० वर्षे, धंदा- पेशंट सांभाळणे, रा.ठी. महात्मा फुले नगर पुतळयाजवळ, आय.आय.टी पवई, मुंबई. हया के.डी दवाखान्या समोर, महात्मा फले नगर, आय.आय.टी पवई, मुंबई. येथे गरबा खेळण्यास गेल्या या गोष्टीचा राग येवून फिर्यादीचे पती अटक आरोपी पुरुष वय- ३० वर्षे याने त्याचे जवळील चाकु फिर्यादीच्या पोटात खुपसला व फिर्यादीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१८/१०/२०२६ रोजी गु.र.क्र.९८८/२६, कलम१०९(१), ३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
